Vol II Issue X
ISSN No : 2230-7850

Monthly Multidiciplinary
Research Journal

# *Indian Streams Research Journal*

Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-chief
H.N.Jagtap

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.


## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra


**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Indian Streams Research Journal
Volume 2, Issue.10,Nov. 2012
**ISSN:-2230-7850**
Available online at www.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# महाराष्ट्रातील सहकारी चळवळ

*हेमलता नामदेव कावरे*

आबासाहेब गरवारे महाविद्यालय कर्वेरोड, पुणे

*सारांश :*

'विना सहकार नही उध्दार' या उक्तीवर सहकार आधारलेला आहे. 1 मे 1960 रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. महाराष्ट्राच्या विकासाला आकार व दिशा देण्यामध्ये सहकार क्षेत्राचा मोठा वाटा आहे. सहकार क्षेत्रातील मुलभूत उद्दिश्टे डोळयासमोर ठेवून स्व. यशवंतराव चव्हाण यांनी सहकार चळवळ गतीमान केली. स्व. वसंतदादा पाटील यांनी ती वाढविली आणि केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांनी ती रूजवली. यातूनच सहकार म्हणजे महाराष्ट्र असे चित्र या राज्यात गेल्या 50 वर्षात निर्माण झाले असुन देशातील एकुण सहकारापैकी 70 टक्के क्षेत्र महाराष्ट्रातच आहे असे म्हटले जाते.

*प्रस्तावना :*

1944 साली रॅाडेल पायोनिअर्स या रूपाने सहकार चळवळीची सुरूवात लंडनमध्ये म्हणजे युरोपमध्ये सर्वप्रथम झाली. पाश्चिमात्य देशातील या सहकार चळवळीची बीजे एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस भारतात रूजली आणि विसाव्या शतकाच्या सुरूवातीला म्हणजे 1904 साली सहकार कायदा मंजूर झाला. या कायदयान्वये भारतात सहकारी तत्वावर संस्था स्थापन करण्याची परवानगी मिळू लागली. हा कायदा येताच सहकारी पतसंस्था, सहकारी गृहनिर्माण पतसंस्था, सहकारी बँका नोदणीकृत झाल्या. भारतात सहकारी संस्थांचे जाळे निर्माण होऊ लागले. 1904 च्या सहकारी कायदयामूळे त्या चळवळीला एक कायदयाची चौकट लाभली. 1912 साली या कायदयात सुधारणा होऊन केवळ आर्थिक व्यवहार न करणाऱ्या सहकारी संस्थानाही परवानगी मिळू लागली. या कायदयामूळे सहकारी संस्था वेगाने अस्तित्वात आल्या.

*शोधनिबंधाची अभ्यासपध्दती*

प्रस्तुत शोध निबंध हा महाराष्ट्र राज्यातील गेल्या 50 वर्षातील आर्थिक विकासाचा आढावा घेणारा आहे. महाराष्ट्र राज्याची 1960 नंतरची बदलती अर्थव्यवस्था हा सहकार क्षेत्राने बजावलेली कामगिरी अजमवण्याचा एक प्रयत्न आहे. संपूर्ण महाराष्ट्र राज्यातील सहकार चळवळीचा आढावा घेतला आहे. सदर शोध निबंध हा महाराष्ट्रातील सहकार चळवळीसमोर निर्माण झालेल्या विविध आव्हानांचा व उपाययोजनांचा परामर्श घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. हा शोध निबंध प्रामुख्याने दुयम साधनसामुग्रीवर आधारित असून महाराष्ट्र आर्थिक पाहाणी 2010–2011 या शासकीय माहितीच्या व विविध नियतकालिकांना आधारभूत मानून तयार करण्यात आला आहे.

*संशोधनाची उद्दिष्टे:*

1.महाराष्ट्रातील सहकारी चळवळीच्या प्रगतीचा आढावा घेणे.
2.सहकार चळवळीतील संख्यात्मक वाढ व गुणात्मक वाढ यांची तुलना करणे.
3.महाराष्ट्रातील सहकारी चळवळीच्या विकासांच्या टप्प्यांचे अध्ययन करणे

*गृहितके:*

1.सहकार चळवळीची संख्यात्मक प्रगती झाली आहे.
2.सहकार चळवळीमूळे महाराष्ट्र राज्याच्या विकासात भर पडत आहे
सहकारामूळे महाराष्ट्रात रोजगार निर्मिती होण्यास मदत झाली आहे.

*महाराष्ट्रातील सहकारी चळवळ:*

1944 साली रॅाडेल पायोनिअर्स या रूपाने सहकार चळवळीची सुरूवात लंडनमध्ये म्हणजे युरोपमध्ये सर्वप्रथम झाली. पाश्चिमात्य देशातील या सहकार चळवळीची बीजे एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस भारतात रूजली आणि विसाव्या शतकाच्या सुरूवातीला म्हणजे 1904

सालो सहकार कायदा मंजूर झाला. या कायदयान्वये भारतात सहकारी तत्वावर संस्था स्थापन करण्याची परवानगी मिळू लागली. हा कायदा येताच सहकारी पतसंस्था, सहकारी गृहनिर्माण पतसंस्था, सहकारी बॅंका नोदणीकृत झाल्या. भारतात सहकारी संस्थांचे जाळे निर्माण होऊ लागले. 1904 च्या सहकारी कायदयामूळे त्या चळवळीला एक कायदयाची चौकट लाभली. 1912 साली या कायदयात सुधारणा होऊन केवळ आर्थिक व्यवहार न करणार्यिा सहकारी संस्थानाही परवानगी मिळू लागली. या कायदयामूळे सहकारी संस्था वेगाने अस्तित्वात आल्या.

1919 साली मुंबई सरकारने या संदर्भात कायदा केला. साधारणतः 1919 ते 1929 साली या क्षेत्रात ज्या काही घडामोडी होत होत्या ती केवळ संख्यात्मक वाढ होती, गुणात्मक नव्हती म्हणून हा कालखंड सहकारी इतिहासात सुनियोजित विकासाचा नव्हता. आज सहकारी चळवळीला 100 वर्ष उलटून गेली आहेत. तरीपण आज भारतात सहकार प्रामुख्याने कोठे आहे, असे विचारले तर तो महाराष्ट्रात आहे असे म्हट़ले जाते. महाराष्ट्रातील सहकार चळवळ, भारतातील पहिला सहकारी साखर कारखाना विठ्ठलराव विखे पाटील यांच्या प्रयत्नामूळे प्रवरानगर, जिल्हा. अहमदनगर येथे स्थापन झाला. कोल्हापूर जिल्हा शेतकरी विणकर सहकारी संस्थेने भारतातील पहिली सहकारी तत्वावरील सुतगिरणी इचलकरंजी येथे स्थापन झाली.

देशातील सर्वात जास्त गाळप क्षमता असणारा शेतकरी सहकारी साखर कारखाना सांगली येथे स्थापन झाला. सांगली, सातारा, कोल्हापुर, अहमदनगर हे जिल्हे सहकार क्षेत्रात अग्रेसर राहिले. साखर उद्योग, सुतगिरण्या, कृषि पतपुरवठा, नागरी पतपुरवठा, हातमाग, विणकाम, गृहबांधणी ग्राहक भांडार, दुग्धव्यवसाय, कृषि ऊत्पन्न खरेदी–विक्री, शेती, कुकुटपालन, पशुपालन, रेशीम उद्योग, चर्मोद्योग, भूविकास इ. क्षेत्रात मिळून 1, 65,789 सहकारी संस्था कार्यरत होत्या. या संस्थाची सभासद संख्या सुमारे चार कोटी 13 लाख इतकी होती. उपलब्ध माहितीपैकी देशातील एकुण सहकारी संस्थापैकी 27 टक्यांहून अधिक संख्या जवळजवळ 15 टक्के सदस्य संख्या 25 ते 30 टक्यांच्या दरम्यान भागभांडवल व एक चर्तुर्थांश खेळते भांडवल महाराष्ट्रात होते. राज्यातील एकुण रोजगारात सहकारी क्षेत्राचा वाटा 12 टक्याहून अधिक होता.

सहकाराची व्याप्ती हळूहळू मराठवाडा, विदर्भ खान्देशपर्यत वाढली. राज्यातील रोजगारीचा प्रश्न सोडविण्यासाठी सहकारी साखर कारखान्यांनी मोठा हातभार लावला असून एक सहकारी साखर कारखाना सुमारे पाच–सहा हजार लोकांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार मिळवून देतो. महाराष्ट्र राज्याच्या सामाजिक व आर्थिक विकासातील सहकारी साखर कारखान्यांचा सहभाग उल्लेखनीय आहे.

तक्ता क्र.1.1
महाराष्ट्रातील सहकारी चळवळीची प्रगती.

Progress in Co-Operative Movement in Maharashtra
( सभासद लाखात व रूपये कोटीत / Members in Lakh & Rs. In Croce)

| बाब | 1961 | 1971 | 1981 | 1991 | 2001 | 2008 | 2009 |
|---|---|---|---|---|---|---|---|
| एकुण सहकारी संस्था | 31565 | 42603 | 60747 | 104620 | 158016 | 205753 | 212344 |
| एकुण सभासद | 42 | 86 | 148 | 270 | 430 | 505 | 517 |
| वसुल–भाग भांडवल | 53 | 238 | 600 | 1957 | 7560 | 12809 | 14969 |
| पैकी शासनाचे | 8 | 39 | 105 | 385 | 1150 | 1917 | 2178 |
| स्वनिधी | 73 | 345 | 1207 | 3935 | 17770 | 35764 | 38758 |
| ठेवी | 76 | 315 | 1939 | 11048 | 74462 | 104162 | 118024 |
| खेळते भांडवल | 326 | 1490 | 5210 | 24713 | 134441 | 205110 | 236401 |
| वर्षातील कर्जवाटप (निव्वळ) | 95 | 348 | 1116 | 6300 | 43392 | 88166 | 82556 |
| लेखापरीक्षण वर्ग | | | | | | | |
| अ | 3110 | 3600 | 3671 | 4966 | N.A | 3986 | 4474 |
| ब | 10921 | 12341 | 11670 | 13581 | N.A | 11919 | 13721 |
| क | 7515 | 16122 | 18854 | 17058 | N.A | 13876 | 14949 |
| ड | 3088 | 3886 | 3477 | 862 | N.A | 3182 | 2395 |
| वर्ग न दिलेल्या | 291 | 865 | 774 | 4006 | N.A | 472 | 569 |
| लेखापरीक्षण न झालेल्या | 6640 | 5787 | 22300 | 67747 | N.A | 76298 | 83668 |
| लेखापरीक्षणासाठी अपात्र | - | - | - | - | N.A | 1451 | 1830 |

स्त्रोतः महाराष्ट्रातील सहकारी चळवळ एका दृष्टीक्षेपात–2010
सहकार आयुक्त व निबंधक संस्था, महाराष्ट्र राज्य– 47 वे प्रकाशन.

वरील तक्त्यावरून असे स्पष्ट होते की 1961 मध्ये एकूण सहकारी संस्थांनी प्रमाण 31565 होते ते 2009 पर्यत 212344 पर्यंत वाढलेले दिसून येते म्हणजेच 49 वर्लात महाराल्ट्रात सहकारी संस्थांची संख्या 1,80,779 एवढया प्रचंड प्रमाणात वाढलेली दिसून येते, तर सन 2009 अखेर 517 लाख सभासद या सहकारी सोसायटयांचे आहेत. व एकुण सहकारी संस्थांचा स्वनिधी हा 38758 कोटी रूपये इतका आहे.

तक्ता क्र.1.2

महाराष्ट्रातील सहकारी क्षेत्रात झालेली रोजगार निर्मिती

( संख्या लाखात / No. in Lakh)

| अ.क्र | बाब | संख्या |
|---|---|---|
| 1 | 2001 च्या जनगणनेनुसार काम करणाऱ्यांची संख्या | 411.73 |
| 2 | मार्च 2009 अखेर सार्वजनिक व खाजगी क्षेत्रात झालेली रोजगार निर्मिती | 31.18 |
| 3 | सार्वजनिक व खाजगी क्षेत्रातील रोजगार निर्मितीचा एकूण काम करणाऱ्या संख्येची टक्केवारी | 31.18 |
| 4 | मार्च 2009 अखेर सहकार क्षेत्रातील रोजगार निर्मिती | 3.78 |
| 5 | सहकार क्षेत्रातील रोजगार निर्मितीचा एकूण निर्मितीशी टक्केवारी | 0-92 |

संदर्भ : महाराष्ट्राची आर्थिक पहाणी 2009–2010 अर्थ व सांख्यिकी संचालनालय.

महाराष्ट्रात सहकार क्षेत्रामूळे रोजगार निर्मितीत भर पडलेली दिसून येते.मार्च 2009 अखेर एकूण रोजगारापैकी 3.78 टक्के रोजगार हा सहकार क्षेत्रातून निर्माण झालेला आहे. त्या तुलनेत सार्वजनिक व खाजगी क्षेत्रातील रोजगार निर्मितीचे प्रमाण हे जास्त आहे. एकूण रोजगार निर्मितीत सहकार क्षेत्राचा वाटा हा 0.92 टक्के असला तरी या क्षेत्रामूळे सहकारास चालना मिळालेली दिसून येते.

***सहकाराचे महत्व व उपयुक्तता:***

1.राष्ट्रविकसीत करण्यात सहकाराचा महत्वाचा वाटा आहे. सहकारामुळे शेतीसाठी पाणीपुरवठा, भांडवल तसेच गृहनिर्माण, कमी नफा घेऊन वस्तू विनिमय, कर्जपुरवठा,शिक्षण, गरजेच्या वस्तू आदी बाबींमध्ये सहकाराचे महत्व लक्षात येऊन ग्रामीण भागात वसलेल्या तसेच शहरी भागासाठी सहकाराचे महत्व अनन्यसाधारण आहे. सहकारामुळे सामान्य माणसाचा विकास होतोच. पण त्याचबरोबर पर्यायाने समाजाचा विकास होतो.

2.सहकारी तत्वावर अनेक उद्योग निर्माण होतात. सुतगिरणी, साखर, मासेमारी, भातगिरण्या, बॅंका, प्रक्रिया उद्योग आदीमूळे राष्ट्रीय उत्पन्नात वाढ झाली आहे.

3.सहकारामूळे कृषि क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञान वेगाने पसरले आहे. सुधारित बी–बियाणे, खते, किटकनाशके, यंत्रे, इ. कृषि उत्पादनात वाढ झालेली आहे.

4.सहकारामुळे पर्यायी कृषि व्यवसाय वाढीस लागले आहेत.
5.सहकाराने समता, बंधुता व भेदभाव रहीत समाजरचना निर्माण होण्यास मदत मिळाली आहे.

***सहकारातील उणिवा व दोषः***

1.सहकारात झालेली वाढ ही केवळ संख्यात्मक वाढ झाली आहे. गुणात्मक नाही.
2.प्रामुख्याने सहकार कायदा हा शेतकऱ्यांची सावकारी पाशातून सोडवणूक करण्यासाठी निर्माण झाला. परंतु ग्रामीण भागात आजही शेतकरी सावकारी कर्जातून पिळून निघत आहे. त्यामूळे शेतकरी आत्महत्या करीत आहेत.
3.नोंदणी झालेल्या सहकारी संस्था जास्त परंतु प्रत्यक्ष काम करणाऱ्या संस्थाचे प्रमाण कमी आहे.
4.सहकारी संस्थामध्ये अधिकारी, कर्मचारी यांची मनमानी चाललेली दिसते. त्यामूळे दुसऱ्या पक्षावर अन्याय होतो.
5.अकार्यक्षम संस्था, थकबाकीचे वाढते प्रमाण भ्रष्टाचार, नियम न पाळण्याची वृत्ती इ. गोष्टी सहकारास मारक आहेत.
6.सहकारी संस्थात अनेक संधीसाधू दलाल, सावकारांचे वर्चस्व आहे. त्यामूळे निष्ठावंत नेते

*निष्कर्षः*

1.महाराष्ट्रात स्वातंत्र्योत्तर काळात सहकारी संस्थांची संख्यात्मक वाढ मोठया प्रमाणात झाली. आहे. परंतु गुणात्मक वाढ झालेली नाही.
2.भारतामध्ये सहकाराची सर्वात जास्त प्रगती महाराष्ट्रात झालेली दिसून येते.
3.महाराष्ट्रातील उपलब्ध नैसर्गिक संसाधने व मानवी साधन संपत्तीचा विचार करता सहकार चळवळीचा विकास घडवून आणण्यास अद्यापही वाव आहे.
4.महाराष्ट्राच्या आर्थिक विकासात सहकारी साखर कारखाने, सहकारी बॅंक व्यवसाय व खरेदी विक्री सहकारी संस्थांनी रोजगार निर्मितीत मोलाचे योगदान दिले आहे.
5.राज्यात कृषि क्षेत्र हे महत्वपूर्ण क्षेत्र असल्याने सहकारी संस्थाची कृषि विकासातील व ग्रामीण विकासातील भूमिका महत्वाची असून त्यादृष्टीने शेती व शेती पूरक उद्योगात सहकारी संस्थांचा विकास घडवून आणल्यास महाराश्ट्राचा आर्थिक विकास आखणी उंचावेल.
6.महाराष्ट्रातील सहकारी संस्थांमधील विविध प्रकारचा प्रादेशिक असमतोल दूर केल्यास सहकारी संस्थांची मुक्त अर्थव्यवस्थेतील स्पर्धात्मकता निश्चितपणे वाढू शकेल.
7.राज्याच्या ग्रामीण विकासात 1960–61 पासून सहकारी क्षेत्राने बजावलेली कामगिरी विचारात घेता सध्या सहकार क्षेत्राच्या विकासासाठी सुयोग्य शासकीय धोरण व सहकारांतर्गत सहकार या तत्वांचा काटेकोर अमंलबजावणीची नितांत आवश्यकता आहे.
8.महाराष्ट्राचा भविष्यकालिन ग्रामीण व शहरी विकास साध्य करण्यासाठी ' विनासहकार नही उद्वार' या सहकाराच्या घोषवाक्याची जाणीवपूर्वक अमंलबजावणी करण्यासाठी राज्य सरकार व सहकाराशी संबधित सर्व सर्व घटकांनी व्यापक प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे.

*संदर्भसूचीः*

1.महाराष्ट्राची आर्थिक पाहाणी 2009–2010 अर्थ व साख्यिंकी संचालनालय नियोजन विभाग महाराष्ट्र शासन मुबंई
2.भारतीय अर्थव्यवस्था राजेंद्र रसाळ
3.महाराष्ट्रातील सहकार चळवळ – एका दृष्टीक्षेपात, सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे–411001 पुणे 2006 2007 व 2008 2009 व 2010

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net